**पोलीस अधीक्षक कार्यालय नाशिक ग्रामीण,**
पोलीस मुख्यालय, आडगाव नाशिक - पीन ४२२००३, दुरध्वनी नंबर ०२५३-२३०९७००
**E.mail - sp.nashik.r@mahapolice.gov.in**

---

**प्रेसनोट** दिनांक : ०९/०८/२०२३

## नाशिक ग्रामीण वाहतूक पोलीसांकडून महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना रस्ता सुरक्षा, सायबर गुन्हे व पॉक्सो कायद्यायासंदर्भात जनजागृतीपर मार्गदर्शन

---

आज दिनांक ०९ ऑगस्ट २०२३ रोजी क्रांती दिनाचे औचित्य साधून नाशिक ग्रामीण वाहतूक नियंत्रण शाखेतर्फे जिल्हयातील येवला व लासलगाव पोलीस ठाणे हद्दीतील महाविद्यालयांमध्ये रस्ता सुरक्षा तसेच पॉक्सो व सायबर गुन्हयांसदर्भात जनजागृती अभियान राबविण्यात आले.

सदर अभियानाअंतर्गत येवला तालुक्यातील एस.एन.डी.अभियांत्रिकी महाविद्यालय, तसेच आर्टस्, कॉमर्स व सायन्स महाविद्यलाय लासलगाव येथील विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी नाशिक ग्रामीण जिल्हा वाहतुक नियंत्रण शाखेचे सहा.पोलीस निरीक्षक श्री.प्रविण पाटील तसेच प्रादेशिक परिवहन विभाग, नाशिक येथील सहायक मोटर वाहन निरीक्षक श्री. स्वप्निल वाकळे, श्री. शिवाजी विभुते यांचेसह वाहतूक नियंत्रण शाखेचे पोलीस अंमलदार पोहवा प्रकाश सगळे, पोकॉ निलेश आव्हाड यांनी उपस्थितांना वाहतुक नियमांविषयी माहिती दिली. यात विनापरवाना वाहन चालवू नये, अल्पवयीन मुलांना वाहने चालविण्यास देवू नये, दुचाकी चालवितांना हेल्मेटचा वापर करावा तसेच वेगमर्यादेपेक्षा अतिवेगाने वाहन चालवु नये, वाहन चालवितांना मोबाईल फोन वापरणे टाळावे, रस्त्यांवर धोकादायकरित्या वाहन चालवु नये, वाहन चालवितांना पादचा-यांना प्राधान्य द्यावे, लेन कटींग करू नये, रस्ता सुरक्षेसाठी सुचना फलक, चिन्हे यांचेकडे लक्ष देवुन त्यांचे काटेकोरपणे पालन करावे, अपघातग्रस्त व्यक्तीचे प्राण वाचविणे व त्यास तात्काळ वैद्यकिय उपचार मिळवुन देणे हे प्रत्येक व्यक्तीचे प्रथम कर्तव्य आहे या सर्व बाबी समजावून सांगण्यात आल्या.

तसेच सध्याच्या संगणकीय युगात विद्यार्थीवर्ग मोबाईल फोन, इंटरनेट व सोशल मिडीयाकडे जास्त आकर्षित झालेले आहेत. सायबर गुन्हेगार हे सर्वसामान्य नागरीक व अल्पवयीन मुलांचे अज्ञानाचा फायदा घेवून ऑनलाईन बँकिंग फ्रॉड, सेक्सटॉर्शन, बनावट सोशल मिडीया अकाउंटवरून होणारे स्कॅम अशा विविध मार्गांनी फसवणूक करत असल्याने सदरबाबत मार्गदर्शन करून जनजागृती करण्यात आली. तसेच लैंगिक अपराधांसंदर्भात कायद्यात असलेल्या तरतुदी समजावून सांगण्यात आल्या, शालेय विद्यार्थी-विद्यार्थीनी कोणत्याही अत्याचाराला बळी पडणार नाहीत यादृष्टीने मार्गदर्शन करण्यात आले.

सदरवेळी दोन्ही महाविद्यालयांचे प्राचार्य, प्राध्यापक वर्ग तसेच विद्यार्थ्यांचे पालक व विद्यार्थी मोठया संख्येने उपस्थित होते.